**महाराष्ट्राचे औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण, २००६ ला दि.३१ ऑगष्ट,२०११ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्र. आयआयआय-पॉलिसी २०११/(प्र.क्र. १६६)/उद्योग-२
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २९ जून, २०११

**संदर्भ :** शा.नि.क्र. आयआयआय-पॉलिसी २०११/(प्र.क्र. १६६)/उद्योग-२, दि. २९ जून, २०११

**शासन निर्णय**

शासन निर्णय क्रमांक : आयएमसी २००६/(प्र.क्र.१३४६)/उद्योग-२, दि. १२.२.२००७ अन्वये जाहिर करण्यात आलेल्या महाराष्ट्राचे औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण २००६ चा कालावधी दि. ३१ मार्च, २०११ रोजी समाप्त होत असल्याने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये त्यास दि. दि. ३० जून, २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. नवीन औद्योगिक धोरण २०११ तयार करण्याची प्रक्रीया अंतिम टप्पात असल्याने तसेच उक्त धोरणाचा वाढीव कालावधी दि. ३० जून, २०११ रोजी समाप्त होत असल्याने प्रचलित राज्य औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण २००६ ची मुदत दि. ३१ ऑगष्ट, २०११ पर्यंत वाढवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनौ.सं.क्र.२२५/११, दि.२३ जून, २०११ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०६२९१७०९४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कांचन विजयन )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

४. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव

५. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव

६. मा. मंत्री व मा. राज्यमंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव

७. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

८. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

९. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

१०.शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव तसेच सर्व मंत्रालयीन विभाग

११. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई

१३. सर्व जिल्हाधिकारी.

१४.उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या नियंत्रणाखालील महामंडळे/ शासकीय उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी.

१५.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ, मुंबई.

१६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव/ कक्ष अधिकारी

१७. उद्योग सहसंचालक/ अधिक्षकीय उद्योग अधिकारी, मुंबई प्राधिकरण विभाग / कोकण विभाग / पुणे /नाशिक/ अमरावती /औरंगाबाद/नागपूर.

१८.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र( सर्व)

१९.निवड नस्ती (उद्योग-२)